(२९/१२/२०२२)

# कारंबा गावामध्ये मोफत घरगुती विद्युत उपकरणे दुरुस्ती शिबिर डिसेंबर २०२२






श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान, संचालित लोकमंगल शिक्षण संस्थेच्या २५ व्या रौप्य महोत्सवानिमित्त २९/१२/२०२२ रोजी लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वडाळा आयोजित विद्युत उपकरणाच्या दुरुस्तीचे शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या विजतंत्री शाखेच्या प्रशिक्षणार्थ्यांनी कारंबा गावातील ग्रामस्थांच्या घरगुती विद्युत उपकरणांची तपासणी व दुरुस्ती केली. यामध्ये इलेक्ट्रिक मिक्सर, इस्त्री, सिलिंग फॅन, डिस्ट्रीब्यूशन बोर्ड, सबमर्सिबल पंप, ग्रामपंचायतचे आर ओ प्लांट, मिक्सर ची भांडी इत्यादी उपकरणांची मोफत तपासणी तसेच मोफत दुरुस्ती केली. या शिबिराचे उद्घाटन कारंबा गावचे माननीय श्री विनायक सुतार सर यांच्या हस्ते झाले तसेच कार्यक्रम स्थळी ग्रामपंचायत सदस्य श्री नवनाथ कांबळे आणि कारंबा गावचे ग्रामस्थ यांची उपस्थिती होती. लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थे मधील विजतंत्री व्यवसायाचे निदेशक श्री संभाजी जाधव सर आणि डिझेल मेकॅनिक व्यवसायाचे निदेशक श्री प्रदीप विटकर सर त्याचप्रमाणे वीजतंत्री व्यवसाया मध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या ३२ प्रशिक्षणार्थ्यांची उपस्थिती होती.